# विशेष प्रकल्पातून कापूस उत्पादकतेत वाढ

अग्रोवन वृत्तसेवा

**नागपूर :** कापूस उत्पादकता वाढीचे अनुषंगाने राबविण्यात आलेल्या विशेष प्रकल्पाचे सकारात्मक परिणाम दिसून आले असून या माध्यमातून हाय डेन्सिटी प्लांटिंग सिस्टीममध्ये सरासरी उत्पादन एकरी ८.६८ क्विंटलपर्यंत पोहोचले आहे. त्यामुळेच या प्रकल्पाला शेतकऱ्यांचा गेल्या तीन वर्षांत प्रतिसाद वाढता असल्याची माहिती केंद्रीय कापूस संशोधन संस्थेने दिली आहे.

कापूस उत्पादकता वाढविण्याच्या उद्देशाने केंद्रीय कापूस संशोधन संस्थेच्या माध्यमातून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत कापूस विशेष प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. सार्वजनिक-खासगी भागीदारी आणि क्लस्टर आधारित संकल्पनेवर या प्रकल्पाची अंमलबजावणी होत आहे. त्यानुसार सन २०२३-२४ मध्ये देशातील आठ प्रमुख कापूस उत्पादक राज्यांतील ६१ जिल्ह्यांमध्ये हा प्रकल्प राबविण्यात आला. ३१६ क्लस्टर्सच्या माध्यमातून ९,०६४ हेक्टर क्षेत्रावर याची अंमलबजावणी झाली. त्यामध्ये १०,४१८ शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला. त्यानंतर सन २०२४-२५ मध्ये प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबविण्यात आला. त्यामध्ये जिल्ह्यांची संख्या वाढून ६५ झाली, तर क्लस्टर्स ४६१ पर्यंत पोहोचले.

या टप्प्यात सुमारे १४,७४० हेक्टर क्षेत्रावर १७,२५१ शेतकरी सहभागी झाले. सलग दोन वर्षांत मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे हा प्रकल्प उत्तर भारतातील पंजाब व हरियाणा राज्यांपर्यंत विस्तारण्यात आला. सध्या सन २०२५-२६ मध्ये आंध्र प्रदेश, गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, तामिळनाडू, तेलंगणा, हरियाणा आणि पंजाब अशा दहा राज्यांमध्ये हा प्रकल्प सुरू असून १४,५९७ हेक्टर क्षेत्रावर १७,४३३ कापूस उत्पादक शेतकरी सक्रिय सहभाग घेत आहेत.

विशेषतः महाराष्ट्रात मागील तीन वर्षांत या प्रकल्पांतर्गत समाविष्ट क्षेत्र आणि सहभागी शेतकऱ्यांची संख्या सातत्याने वाढत असून, कापूस शेतीत सुधारित तंत्रज्ञान स्वीकारण्यासाठी शेतकरी पुढे येत असल्याचे यावरून स्पष्ट होते, असे संस्थेने कळवले आहे.